

10 कोटींच्या म्बरग्रीससह तीन आरोपी अटकेत पान ३ वर



आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

वेर्णा, शनिवार, ७ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 275 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 7 June 2025 | Pages 4 | ₹ 4

भारताचे नेतृत्व करणे ही मोठी जबाबदारी : गिल पान ४ वर

# पीडब्ल्यूडीच्या परिपत्रकाचे गौडबंगाल काय?

## कमी दराची निविदा स्वीकारण्यास मुभा | परिपत्रकाचा पुनर्विचार करण्याची झेडपीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**मडगाव, दि. ६ : दक्षिण गोवा जिल्हा पंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी ) निविदा धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त करत, कमी बोली स्वीकारण्यास मुभा देणाऱ्या अलीकडील परिपत्रकाचा पुनर्विचार करण्याची मागणी राज्य सरकारकडे केली आहे. विशेषत:, अंदाजे खर्चाच्या २०% पेक्षा कमी रकमेची निविदा स्वीकारण्याची अनुमती देणाऱ्या धोरणामुळे सार्वजनिक प्रकल्पांची गुणवत्ता आणि कार्यक्षम अंमलबजावणी धोक्यात येण्याची भीती सदस्यांनी व्यक्त केली.**

जिल्हा पंचायत अध्यक्षा संजना वेळीप यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या बैठकीत सदस्यांनी एकमुखाने चिंता व्यक्त केली. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना वेळीप म्हणाल्या, अशा निविदांमुळे कंत्राटदारांना काम आर्थिकदृष्ट्या परवडत नसेल, तर प्रकल्प अर्धवट सोडण्याचा धोका निर्माण होतो. परिणामी, दर्जाहीन कामे होण्याची शक्यता वाढते.

उपाध्यक्ष सिद्धार्थ देसाई यांनीही याला दुजोरा दिला. तर माजी अध्यक्षा सुवर्णा तेंडुलकर यांनी यासंदर्भात धोरणात्मक स्पष्टता आवश्यक असल्याचे मत मांडले. त्यांनी स्पष्ट केले की, जिल्हा पंचायतीकडे फक्त १५ लाखांपर्यंतच्या कामांचे अधिकार आहेत. अशा लहान प्रकल्पांमध्येही जर २०% पेक्षा कमी दराच्या निविदा स्वीकारल्या गेल्या, तर त्या प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता आणि गुणवत्ता यांच्यावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते.

या पार्श्वभूमीवर सर्व सदस्यांनी परिपत्रकाचा पुनर्विचार करण्याची शिफारस करणारे अधिकृत निवेदन राज्य सरकारला सादर करण्याचा ठराव संमत केला. बैठकीत निधी आणि प्रलंबित प्रकल्पांसंदर्भातील मुद्द्यांवरही चर्चा झाली. वेळीप यांनी स्पष्ट केले की, काही निधी अखर्चित' म्हणून नोंदवलेला असला, तरी तो पूर्ण झालेल्या कामांच्या प्रतीक्षेत असलेल्या बिलांशी संबंधित आहे. सदस्यांनी १५व्या वित्त आयोगांतर्गत काही प्रकल्प प्रणालीत अद्याप अपलोड न झाल्याची तक्रारही मांडली. यावर वेळीप यांनी आश्वासन दिले की सर्व प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यावर भर दिला जाईल.

तत्पूर्वी, ११ कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्याची आणि लवकरच त्यांचे निविदा प्रस्ताव मागवले जाण्याची माहितीही देण्यात आली. मात्र, जिल्हा पंचायतसाठी प्रस्तावित असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामासंदर्भात जागेची निवड अद्याप निश्चित झालेली नाही. याअगोदर सुचवलेली जागा पार्किंग आणि मूलभूत सुविधांअभावी अपुरी ठरली आहे.

बैठकीत कनिष्ठ अभियंत्यांच्या कमतरतेचाही प्रश्न ऐरणीवर आला. मंजूर असलेल्या पाच पदांपैकी सध्या फक्त एक अभियंता पूर्णवेळ काम करतो, तर उर्वरित चार अभियंत्यांकडे दोन-दोन ठिकाणी कामांची जबाबदारी आहे. यामुळे बिल प्रक्रिया आणि प्रकल्प देखरेखीवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले. यावर उपाय म्हणून जिल्हा पंचायत सदस्यांनी विभागात किमान चार पूर्णवेळ कनिष्ठ अभियंते नियुक्त करण्याची मागणी केली, जेणेकरून प्रकल्पांची गुणवत्ता आणि वेळेत अंमलबजावणी सुनिश्चित होईल.

## निवडक

### चीनमध्ये आढळणारा विषाणू मानवांमध्येही पसरू शकतो

**वॉशिंग्टन, दि. ६ :** कोरोनानंतर आता चीनमध्ये एक नवीन विषाणू आढळला आहे. अमेरिकन शास्त्रज्ञांनी इशारा दिला आहे की, एचकेयू ५-सीओव्ही-२ नावाचा हा विषाणू मानवांना संक्रमित करू शकतो.

सध्या, हा विषाणू वटवाघळांमध्ये आढळला आहे, परंतु थोड्या बदलानंतर (उत्परिवर्तनानंतर) तो मानवांमध्ये पसरेल. हा विषाणू एमईआरएस (मिडल ईस्ट रेस्पिरेटरी सिंड्रोम) सारखाच आहे. हा विषाणू प्रथम चीनच्या दक्षिण आणि पूर्वेकडील भागात वटवाघळांमध्ये आढळला. वुहान इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीच्या संशोधकांनी त्याची ओळख पटवली. ही तीच प्रयोगशाळा आहे, जिथून कोविड-१९ लीक झाल्याचा संशय आहे.

ही बातमी अशा वेळी आली आहे जेव्हा आशिया खंडातील सिंगापूर, हाँगकाँग, चीन, थायलंड आणि भारतात कोरोना विषाणूची प्रकरणे वेगाने वाढत आहेत. केवळ भारतात सक्रिय प्रकरणांची संख्या ५ हजारांपेक्षा जास्त झाली आहे.

एचकेयू५-उेत-२ हा विषाणू चएठड-उेत कुटुंबाचा भाग आहे, ज्यामध्ये मध्य पूर्व श्वसन सिंड्रोम सारखे प्राणघातक विषाणू समाविष्ट आहेत. एमईआरएस -उेत प्रामुख्याने वटवाघळांमध्ये आढळतो.

-----------------

### भारताच्या आणखी एका बॉर्डरवर तणाव

**नवी दिल्ली, दि. ६ :** अलीकडेच भारत-पाकिस्तान सीमेवर मोठा तणाव निर्माण झाला होता. दोन्ही बाजुंनी हल्ले झाले. त्यानंतर आता भारताच्या आणखी एका सीमेवर तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. अरुणाचल प्रदेशात भारत-म्यानमार सीमेवर तणावपूर्ण स्थिती निर्माण झालीय. भारताने प्रत्युत्तर देण्यासाठी ऑपरेशन सुरु केलं आहे. सुरक्षापथकांना अरुणाचल प्रदेशच्या लोंगडिंग जिल्ह्यात पोंगचौ सर्कलवर अज्ञात केडर्सच्या हालचालींबद्दल माहिती मिळाली. ही माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा पथकांनी गुरुवारी सीमावर्ती भागात गस्त सुरु केली. संरक्षण मंत्रालयानुसार, घनदाट जंगलातून जाताना सुरक्षापथकांना अज्ञात लोकांच्या हालचाली दिसल्या. एरियामध्ये अज्ञात लोक ये-जा करताना दिसल्यानंतर सुरक्षापथकांनी त्यांना हटकलं. त्यानंतर सुरक्षापथकांनी केलेल्या गोळीबाराला या केडर्सनी सुद्धा गोळीबाराने उत्तर दिले. या गोळीबाराला सुरक्षापथकांनी चोख प्रत्युत्तर दिले. भीषण गोळीबार सुरु असताना अज्ञात केडर आंतरराष्ट्रीय बॉर्डर पार करुन म्यांमारला निघून गेले.

# रेंट अ कार परवान्यांवर कारवाईसाठी अध्यादेश?

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी स्पष्ट निर्देश दिले की, व्यावसायिक उद्देशांसाठी खाजगी वाहने वापरणाऱ्या रेंट अ कार आणि रेंट अ बाईक चालकांचे परवाने रद्द करण्यासाठी अध्यादेश काढावा. हा आदेश राज्य परिवहन विभागाला दिला गेला असून, गैरवापर टाळण्यासाठी निर्णायक पावले उचलली जात आहेत.

राजधानीतील पोलिस मुख्यालयात घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला. गोव्याच्या सीमांवरील तपासणी नाक्यांवरील पायाभूत सुविधांचा आणि अंमलबजावणी यंत्रणेच्या तयारीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. उत्तर गोव्यातील पत्रादेवी आणि केरी तसेच दक्षिण गोव्यातील मोले आणि पोळे या ठिकाणांची तपासणी यामध्ये समाविष्ट होती.

मुख्यमंत्र्यांनी नंतर 'एक्स' वरून दिलेल्या माहितीप्रमाणे, रस्त्याच्या कडेला सार्वजनिक सुविधा निर्माण करणे आणि महत्त्वाच्या ठिकाणी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या पेट्रोल पंपांची उभारणी करण्यासाठी जागा उपलब्धतेवरही चर्चा झाली.

बैठकीत गोवा इन्फोटेक कॉर्पोरेशनने विकसित केलेल्या वाहतूक-संबंधित ॲप्सच्या प्रगतीचा तसेच वाहतूक पोलीस (एसपी ट्रॅफिक) यांच्या नेतृत्वाखालील अंमलबजावणी योजनांचा आढावाही घेण्यात आला. याशिवाय, सार्वजनिक सूचना प्रणाली, स्वयंचलित सीमा देखरेख व वाहन डेटाबेस एकत्रित करणाऱ्या धोरणांवरही चर्चा झाली. दरम्यान, गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (जीसीसीआय)ने गोवा ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५' चे स्वागत करताना त्याला वेळेवरचे आणि प्रगतीशील पाऊल असे संबोधले आहे.

जीसीसीआय च्या निवेदनात म्हटले आहे की, डिजिटल प्रवेश, विश्वसनीयता आणि सुलभ वाहतूक ही आजच्या व्यवसायासाठी गरजेची झाली आहे. ॲप-आधारित टॅक्सी सेवा ही आता लक्झरी न राहता गरज बनली आहे.

त्यात पुढे नमूद आहे की, गोव्यातील पर्यटन, उत्पादन, रिअल इस्टेट, लॉजिस्टिक्स, किरकोळ विक्री व सेवा क्षेत्रातील उद्योग विश्वसनीय वाहतूक सुविधांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. ॲप-आधारित सेवेमुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढते व व्यवसाय सुलभ होतो.

व्यापार संघटनेच्या मते, नव्या मार्गदर्शक तत्त्वांनी डिजिटल वाहतूक नवोपक्रम आणि स्थानिक रोजगाराचे संरक्षण यामध्ये संतुलन साधले आहे. सरकारनिश्चित भाड्याचे पालन, वेळेवर देयके, आरोग्य विमा, वाहन अनुदान इत्यादींमुळे आर्थिक व सामाजिक सुरक्षा यांची खात्री दिली गेली आहे, असे जीसीसीआयच्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले. या नव्या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून गोव्याला एक आधुनिक, तंत्रज्ञान-सक्षम, गुंतवणूक सुलभ आणि नागरिक-केंद्रित राज्य म्हणून पुढे नेता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# रवींद्र भवन बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकतेची मागणी

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ६ :** रवींद्र भवन, मडगाव येथील स्थळ बुकिंग प्रक्रियेत अलीकडेच करण्यात आलेल्या बदलांवर राज्य सांस्कृतिक विकास समितीचे माजी सदस्य विशाल पै काकोडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नवीन व्यवस्थेमुळे हा सांस्कृतिक केंद्र हुकूमशाही नियंत्रणाच्या विळख्यात अडकला आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

पै काकोडे यांनी सांगितले की, पूर्वी ही प्रक्रिया सुलभ आणि नागरिकांसाठी खुली होती. मात्र आता अध्यक्ष राजेंद्र तालक यांची वैयक्तिक मान्यता प्रत्येक बुकिंगसाठी आवश्यक करण्यात आली आहे, ज्यामुळे ही संपूर्ण प्रणाली एका व्यक्तीच्या मर्जीनुसार चालवली जात आहे. कोणताही कार्यक्रम अध्यक्षांच्या हिरवा कंदीलशिवाय आयोजित करता येत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले. ही प्रणाली एका व्यक्तीचा शो बनली आहे; हे प्रशासन नाही तर लोकशाहीच्या वेशातील हुकूमशाही आहे असे ते म्हणाले.

पै काकोडे यांच्या मते, सांस्कृतिक संस्था ही कलात्मक अभिव्यक्ती, सहभाग आणि पारदर्शकतेची जागा असली पाहिजे. त्यांनी असेही नमूद केले की, अशा नियंत्रणाधीन प्रक्रियेचा कलावंत, आयोजक आणि सामान्य नागरिक यांच्यावर विपरीत परिणाम होतो.परवानगी वैयक्तिक इच्छेवर नव्हे तर स्पष्ट, सुबोध व निष्पक्ष धोरणांवर आधारित असली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.नवीन सदस्य सचिवांनी या अधिकार दुरुपयोगाची तातडीने नोंद घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. पै काकोडे यांनी अधिक पुढे जात म्हणाले की, केंद्रीकृत निर्णय प्रक्रियेमुळे बुकिंगमध्ये विलंब होतो, आयोजकांना अडथळे निर्माण होतात पान २ ▶






# जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे मोदींच्या हस्ते उद्घाटन

**उधमपूर, जम्मू-काश्मीर, दि. ६ :**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी चिनाब नदीवरील जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन करण्यात आले. हा पूल केवळ अभियांत्रिकीचा एक अद्वितीय नमुना नसून भारताच्या पायाभूत सुविधांमधील मैलाचा दगड मानला जात आहे.

भारतीय रेल्वेच्या उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (यूएसबीआरएल) प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या या पुलामुळे जम्मू आणि काश्मीरमधील संपर्क अधिक सक्षम झाला आहे. एकूण २७२ किलोमीटर लांबीच्या या रेल्वे मार्गात ३६ बोगदे आणि ९४३ पूल आहेत. अंदाजे ४३,७८० कोटी रुपये खर्चून साकारलेल्या या प्रकल्पामधून जम्मूतील उधमपूरपासून बारामुल्ला शहरापर्यंत रेल्वेसेवा सुरू होणार असून, यामुळे संपूर्ण भाग वर्षभर सुलभपणे जोडला जाणार आहे.

चिनाब नदीवरील मुख्य पुल हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य आहे. स्टील व काँक्रीटपासून बनवलेला हा पूल १,३१५ मीटर लांब असून, तो पाण्याच्या पातळीपासून तब्बल ३५९ मीटर उंच आहे. हे अंतर पॅरिसमधील आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर अधिक आहे. हा पूल दोन पर्वतरांगेत कमानीच्या साह्याने जोडलेला आहे आणि २६० किमी/तास वेगाच्या वाऱ्यांनाही तोंड देऊ शकतो. भारतीय रेल्वेने या पुलाचे आयुष्य किमान १२० वर्षे असल्याचा दावा केला आहे.

या ऐतिहासिक उद्घाटनाच्या वेळी पंतप्रधानांनी भारतीय ध्वज फडकवला आणि चिनाब पुलाचा आढावा घेतला. त्यांनी नंतर अंजी पुलाच्या उद्घाटन समारंभासाठी चाचणी गाडीने प्रवास केला. अंजी पुल देखील या मार्गावरील आणखी एक अभियांत्रिकी कौशल्याचे उदाहरण आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, ही रेल्वेसेवा संपूर्ण वर्षभर काश्मीरला भारताच्या मुख्य भूप्रदेशाशी जोडेल. ती आध्यात्मिक पर्यटनाला चालना देणार असून स्थानिकांना उपजीविकेच्या नव्या संधी उपलब्ध करून देईल.

पंतप्रधानांनी यावेळी वंदे भारत एक्सप्रेसच्या दोन नव्या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. या गाड्या श्रीनगर आणि कटरा दरम्यान धावणार असून प्रवासाचा कालावधी सात तासांवरून केवळ तीन तासांवर येणार आहे. तसेच, ते भारतातील पहिल्या केबल-स्टेड रेल्वे पुलाच्याही उद्घटनाला उपस्थित राहणार आहेत.

या प्रकल्पामुळे केवळ दळणवळणच नव्हे तर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. प्रकल्पाची पूर्तता काश्मीरच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. दरम्यान, या दौऱ्याचा संदर्भही लक्षवेधी ठरला. एप्रिल अखेरीस भारत-नियंत्रित काश्मीरमध्ये झालेल्या चकमकींनंतर, ज्या भागात २६ जणांचा मृत्यू झाला होता, त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांचा हा पहिला दौरा आहे. भारताने या हल्ल्यांसाठी पाकिस्तानला जबाबदार धरले असले तरी, पाकिस्तानने त्याचे खंडन केले आहे.

काश्मीरमधील दीर्घकालीन तणावाच्या पार्श्वभूमीवर, अशा पायाभूत प्रकल्पांचे महत्त्व अधिक ठळकपणे समोर येते. १९८९ पासून सुरू असलेल्या सशस्त्र आंदोलनात अनेक गट दिल्लीविरोधी लढा देत आहेत. भारत पाकिस्तानवर या गटांना मदत देत असल्याचा आरोप करतो, तर पाकिस्तान हे आरोप नाकारत राहिला आहे.